# राष्ट्रवादी इतिहासलेखन प्रवाह

**कौतिक नामदेव दांडगे**
**संशोधक विद्यार्थी , डॉ.बा.आ.म.विद्यापीठ , औरंगाबाद जि. औरंगाबाद.**



**प्रस्तावनाः**

कोणत्याही देशाच्या, समाजाच्या किंवा घटनेच्या वास्तव इतिहासाचे सर्वांगीण ज्ञान होण्यासाठी संबंधित विषयाचे संशोधन करावे लागते. इतिहास लेखनाची ती प्राथमिक गरज असते, पण तेवढेही पुरेसे होत नाही. संशोधनाने हाती आलेल्या नवीन माहितीच्या आधारे इतिहासलेखन व विश्लेषण केले तरच त्या ऐतिहासिक विषयाचे आकलन होऊ शकते, त्याहीपुढे जाऊन तत्कालीन परिस्थितीच्या योग्य प्रकाशात इतिहासाचे वास्तव स्वरुप स्पष्ट होण्यासाठी त्यावर भाष्य करणे उपयुक्त ठरते. थोडक्यात, संशोधन लेखन, विश्लेषण आणि त्यावरील भाष्य अशा चार कार्यपध्दतींनी इतिहासाचे मंथन झाले तरच त्याचे अंतरंग लक्षात येण्यास मदत होते.
स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या ५० वर्षात भारतातील शासकीय दप्तरखाने, संस्थानिकांची दप्तरे, सरदार, जहागिरदार, वतनदार यांची कागदपत्रे प्रकाशित होत आहेत. काही इतिहास संशोधकांच्या प्रयत्नांतून लंडन, पॅरिस, लिस्बन, फ्रांस येथील भारताविषयी ऐतिहासिक साधने प्रकाशित होत आहेत. नवीन प्रादेशिक विद्यापीठांची स्थापना झाली. राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागातील संशोधकांना, अभ्यासकांना उपयोग करू देण्याची परवानगी शासनाने दिली. यातूनच राष्ट्रवादी इतिहासाला व लेखनाला मोठी चालना मिळाली.

सामान्यतः इतिहास म्हणजे राजकीय घडामोडींचे चित्रच डोळ्यापुढे उभे राहते. अशा इतिहासात सत्ता संपादन करणे, तिचा विस्तार करणे, ती बळकट करणे यालाच प्राधान्य दिले जाते. त्यामुळे अशा इतिहासाच्या लेखनात राजा आणि संबंधित मंत्रीगण, त्यांचे डावपेच, कट आणि कारस्थाने, राज्यातील गुप्त खलबते, अधिकारी आणि सेनापती यांच्या खटपटी, तह आणि करार अशा घटनांनाच महत्त्व प्राप्त होते.

रियासतकार इतिहासाच्या अभ्यासासंबंधी म्हणतात, ''इतिहास हे शास्त्र आहे. इतर शास्त्रांप्रमाणे त्याची वाढ होत गेली पाहिजे. प्रत्येक राष्ट्राला आपल्या इतिहासाची वारंवार उजळणी करणे जरूरी आहे. कालमानाप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे इतिहासाची मांडणी बदलत गेली तरच तिचा राष्ट्रास उपयोग होईल, खरे अभ्यासक ही तत्त्वे लक्षात घेऊन त्याप्रमाणे आपली मनोभूमिका ठेवतात.'' आणि हे सांगत असतांनाच रियासतकार म्हणतात, ''इतिहासाचा मुख्य उपयोग राष्ट्राच्या राजकीय जीवनात प्राधान्ये करून होत असतो.''[१]

मात्र त्यांचा वरील विचार झाल तो भारतीय पारतंत्र्यासंदर्भात. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इतिहासाचा उद्देश अधिक व्यापक झालेला दिसतो. अभेद्य ब्रिटिश साम्राज्याविरोधी अनेक धर्म, जाती, पंथ असणाऱ्या विस्कळीत भारतीयांनी एकत्र येऊन हा ऐतिहासिक लढा दिला. इंग्रज इतिहासकारांनी साम्राज्यवादी दृष्टीकोनातून भारतीय समाजाचे व्यंग शोधले होते. त्याचा प्रतिवाद करणारे इतिहासलेखन राष्ट्रवादी भूमिकेतून होऊ लागले. ग्रँट डफने मराठ्यांच्या इतिहासातील शिवाजी महाराजांच्या मराठी स्वराज्य स्थापनेचे राष्ट्रीय महत्त्व डावलले होते. न्या. रानडे यांनी त्याचा प्रतिवाद करीत मराठ्यांचा इतिहासाची राष्ट्रवादी भूमिकेतून मांडणी केली. पाश्चात्यांच्या इतिहास अभ्यासतला खरे-खोटेपणा तपासला. लोकमाध्यमांतून लिखित इतिहास लेखनाची नवी परंपरा भारतात सुरु झाली. या प्रक्रियेमुळे भारताची राष्ट्रीय अस्मिता सबळ झाली. भारतीयांचा आत्मविश्वास जागवला गेला. इतिहासातील पराक्रमी व्यक्तींची चरित्रे आदर्शभूत मानली गेली. पाश्चात्य इतिहासकारांनी पौराणिक परंपरांना भाकडकथा म्हणून डावलले होते. परंतु राष्ट्रवादी इतिहासकारांनी भारतीय संस्कृतीची प्राचीनता त्यातून शोधली व ही संस्कृती पाश्चात्यांपेक्षाही प्राचीन असल्याचे विवेचन केले. सिंधु संस्कृतीच्या शोधामुळे या

प्रतिपादनाला सामर्थ्य प्राप्त झाले.[२] साम्राज्यवादी इतिहासलेखनाची प्रतिक्रिया म्हणून राष्ट्रवादी इतिहासाची मांडणी झाली. या लढ्याकडे बघणाऱ्या विद्वानांमध्ये, इतिहासकारांमध्ये, विचारवंतांमध्ये त्यांनी आपापल्या परिने या चळवळीचा विचार केलेला दिसून येतो.

साम्राज्यवादी विरोधी दृष्टीकोणाच्या इतिहासकारांना असे वाटते की, भारतीय समाजामध्ये पडलेली फुट व देशांची फाळणी ही ब्रिटिशांमुळे झाली. केंब्रिज ब्राऊन यांच्या मते ही चळवळ एक विशिष्ट दिशेने झाली नाही तर या चळवळीमध्ये जातीला जास्त प्रतिनिधीत्व मिळाले. सक्सेस कॅनबेस विचारसरणीचे लोक शेतकरी व इतर संघटीत उठावांकडे राष्ट्रीय चळवळ म्हणून पाहतात. मार्क्सवादी व बिगर मार्क्सवादी विद्वान यांच्या मते, ग्रामीण भागातून होणारी चळवळ ही महत्त्वाची मानतात. तळागाळातील लोकांच्या चळवळींना ही विचारसरणी महत्त्व देते. अशा विद्वानांमध्ये डेव्हिड हार्डिमन, मजिद सिध्दीकी, कपिलकुमार, ग्यानेंद्र पांडे, स्टिव्हन हेनिंग हॅम, हितेश संन्याल यांचा समावेश होतो.[३]

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विशेषत: भारतीय इतिहासकारांनी मात्र वरील मुद्दे खोडून काढण्यासाठी आधुनिक इतिहासाची मांडणी केली.

याविरुध्द पहिल्या प्रवाहातील इतिहासकारांनी त्यांचे खंडन केले. अशा लेखकात काशीप्रसाद जयस्वाल, राधाकुमुद मुखर्जी यांची नावे विशेष उल्लेखनीय आहे.

दुसरा प्रवाह वस्तुनिष्ठ लेखकांचा आहे. प्राचीन धर्म व संस्कृतीवरील इंग्रजांनी केलेले आरोप त्यांनाही खटकले होते. यात डॉ. रामकृष्ण भांडारकर, डॉ. आळतेकर, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, डॉ. सुमित सरकार, डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांची नावे घ्यावी लागेल.

तिसरा प्रवाह हा ब्रिटिश वसाहतवादाचे आणि इंग्रजांनी चालविलेल्या भारताच्या आर्थिक शोषणाचे स्वरुप उघडकीस आणणारा होता. यात दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त, न्या. म. गो. रानडे यांचा समावेश होता. तसेच प्रो. के. एन. चौधरी, प्रा सुशिल चौधरी, प्रो. इरफान हबीब, प्रो. अमीयकुमार बागची, प्रो. ओमप्रकाश यांच्या कार्यामधून नवीन माहिती मिळू शकते.[४]

बॅ. वि. द. सावरकर यांनी '१८५७ चा उठाव' हे सैनिकांचे बंड नसून स्वातंत्र्ययुध्द होय असे स्पष्ट केले. एस. बी. चौधरी यांनी "Civil Rebellions in the Indian Matiny १८५७-५९" या ग्रंथातून भारतीय स्वातंत्र्य युध्द होय असे स्पष्ट केले. तसेच भारतात हिंदू आणि मुस्लिम गुण्यागोविंदाने नांदत होते असे ही स्पष्ट केले. पं. नेहरू यांनी भारतीय जनतेच्या स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्त्व केले आणि स्वातंत्र्यानंतर भारतीय जनतेच्या विकासाचे स्वप्न त्यांनी पाहिले. राजकारणात व्यग्र असूनही त्यांनी 'ग्लिमसेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी' आणि 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे दोन इतिहासविषयक ग्रंथ लिहिले. या ग्रंथात मोहंजोदोडो, प्राचीन वैदिक साहित्य, समाजरचना, स्थापत्य, निसर्ग यांचे वर्णन करून विषमता, वर्ण व्यवस्था, जातिव्यवस्था याचा निषेध त्यांनी केला.

विसाव्या शतकात मराठ्यांच्या इतिहासावर अनेकांनी लिखाण केले. न्यायमूर्ती रानडे यांनी मराठ्यांच्या सत्तेचा उदय आणि अस्त कसा झाला याची कारणे शोधण्यासाठी तत्कालीन परिस्थितीचे केलेले विश्लेषण शंभर वर्षानंतरही उदबोधक आहे. भारतीय उपखंडाच्या अनेक भागावर मराठ्यांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सत्ता होती. बंगाल, राजस्थान, गुजराथ, कर्नाटक येथील कागदपत्रांच्या आधारे अनेकांनी मराठ्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, प्रशासकीय, लष्करी बाबींवर परिणामकारक लिखाण केले आहे. यात सी.ए. किंकेड आणि द. ब. पारसनिस, गो. सन. सरदेसाई 'द न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज (१९४६-१९४८)' तसेच मराठी रियासत प्रसिध्द आहेत. डॉ. सुरेंद्रनाथ से यांचा लष्करी इतिहास, डॉ. उपेंद्र नारायण चेक्रवती यांचा १९७९ मधील 'ॲग्लो-मराठा रिलेशन्स ॲण्ड मालकम' ग्रंथ, डॉ. प्रांजलकुमार भट्टाचार्य यांचा १९८४ मधील 'ब्रिटिश रेसिडेन्सी ॲण्ड पुना १७८८-१८८८', डॉ. शेलेंद्रनाथ सेन यांचा 'ॲग्लो-मराठा रिलेशन्स १७७२ ते १७८५' हा १९६१ मधील ग्रंथ त्यानंतर ॲन्थनी, एस. बेनेल यांनी लिहिलेला 'द मेकिंग ऑफ आर्थर वेलस्ली' १९१७ या ग्रंथातून बरीच माहिती मिळते.[५]

राजकीय इतिहासलेखनाबरोबरच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहासलेखनाला महत्त्व प्राप्त झाले. यापूर्वी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शूद्रांच्या व ब्राम्हणेत्तरांच्या इतिहासाचा शोध घेतला होता. ग्रामचीच्या लोकेतिहासाच्या तत्त्वज्ञानातून व साम्यवादी विचारांच्या प्रभावातून अलिगड व दिल्लीच्या जे.एन.यू. स्कूलमधून इतिहासलेखनाचे नवे संप्रदाय पुढे आले. सुमित सरकार, बिपीनचंद्र, रणजित गुहा यांनी सबाल्टर्नवादी भूमिका घेऊन वंचितांच्या इतिहासाचा शोध घेतला. इतिहासाच्या पुनर्लेखनाचे प्रयत्न झाले. इतिहास म्हणजे केवळ राजकीय घटनांचा अन्वयार्थ व व्यवस्थापन ही संकल्पना मागे पडून वीरनायकपासून जनसामान्यांपर्यंत सर्वांच्या कार्यकर्तृत्वाची नोंद घेणारा, धर्म अर्थ, कला, कल्पना अशा सर्व अंगांचा साकल्याने शोध घेणारा अभ्यास प्रकल्प अशी नवी धारणा पुढे आली. चरित्र लेखानातूनही इतिहासशोधनाची एक परंपरा या कालखंडात निर्माण झाली. जेम्स मिल, बी.आर. नंदा, धनंजय कीर यांनी चरित्र लेखनाच्या माध्यमातून गोखले, गांधी, नेहरू या व्यक्तिमत्त्वांभोवती गुंफला गेलेला समकालीन इतिहास उलगडण्याचा

प्रयत्न केला. १९५०-६० या काळात भारतीय विचार परंपरेवर डाव्यांचा प्रवाह दिसतो. यात श्रीपात अमृत डागे, रंजनी पाम दत्त, ए.आर.देसाई, डी.डी. गोसंबी यांचा विचार करावा लागेल. तसेच 'स्त्रीवादी इतिहास' हा नवीन इतिहास प्रवाह निर्माण झाला. सर्वच ज्ञान शाखांच्या पुरुषीय वर्चस्वाने बंद झालेला कवाडांना जोरधार धक्का देणाऱ्या या स्त्रीवादी विचारांकडे दुर्लक्ष करणे आजघडीला कोणालाही शक्य नाही.[६]

सद्यपरिस्थितीत भारतीय इतिहासात जुन्या विषयासोबत नवीन विषयाची भर पडत चाललेली दिसून येते. त्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्त्री-पुरुष संबंध, जाती व्यवस्था, दहशतवाद, प्रांतवाद, आर्थिक असमानता, भ्रष्टाचार, राजकीय विषमता याचबरोबर भारत-पाकिस्तानमधील काश्मीर प्रश्न, विविध देशांशी असलेले संबंध यांवर एक नवीन विचारधारा इतिहासामध्ये मोठ्या प्रमाणावर शिरकाव करीत आहे.

स्थापत्य, वैद्यकीय, फॅशन यासारखे विषय इतिहासाशिवाय पूर्ण होतांना दिसून नाहीत. यामुळेच आधुनिक इतिहासाचे लेखन मोठ्या स्वरुपात विस्तारित होत चालल्याचे दिसून येते.

### संदर्भ ग्रंथ :-

१) गर्गे स. मा., **इतिहासाचा सामाजिक वेध**, मान सन्मान प्रकाशन, पुणे, १९९५.
२) गर्गे स. मा., **इतिहासाचे साधने : एक शोध यात्रा,** पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९९६.
३) डॉ. प्रभाकर देव, **इतिहासशास्त्र,** ब्रेन टॉनिक प्रकाशनगृह, नाशिक, २००७.
४) डॉ. कुलकर्णी अ. रा., **मराठ्यांचे इतिहासकार,** डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७.
5) **Subaltern Studies II**- Oxford India Paper Books, 1999.
6) **A Textbook of Historiography 500 B.C. to A.D. 2000,** E. Shreedharah, Oriental Balackswan, New Delhi, 2009.